# प्रेस नोट

**पुणे रेल्वे स्टेशन येथे कोपरगाव येथुन येवुन लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाडयांमध्ये प्रवाशांचे मोबाईल ,बॅग चोरणाऱ्या चार सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखा लोहमार्ग पुणे यांनी केले जेरबंद**

.........................................................................................

फिर्यादी नामे दिलखुश कुमार महेश पासवान ,वय.२२ वर्षे ,धंदा.शिक्षण ,रा.गाव डिह ,छापरार ,पोस्ट .मिल्खीचख ,पो.ठाणे बहादुरपुर ,जि.दरभंगा ,राज्य.बिहार .मो.नं.८२२८९४३६८८ हे दि. ८.०८.२०१८ रोजी पहाटे .०५.५५ वा.दाणापुर पुणे एक्सप्रेसने बोगी नं.एस.८ ,सिट नं.२१ वरुन प्रवास करुन पुणे रेल्वे स्टेशन येथे उतरत असताना प्रवाशांच्या गर्दीमध्ये त्यांचा १०,००० /– रु ,किमतीचा ,oppo कंमनीचा मोबाईल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोपरगाव येथुन अहमदनगर ,दौंड ,पुणे रेल्वे स्टेशन येथे येवुन काही इसम प्रवाशांचे मोबाईल व बॅग चोऱ्या करत असलेबाबत पोलीस निरीक्षक श्री .अनिल दबडे ,स्था.गु.शाखा लोहमार्ग पुणे यांना खबर मिळाली होती .त्यांना मिळालेल्या खबरीवरुन पुणे रेल्वे स्टेशन येथे हावडा पुणे एक्सप्रेसच्या जनरल डब्यावर सापळा लावला असता १) विकी बबनराव लांडगे ,वय.२१ वर्षे ,रा.मुकुंदवाडी ,संजय नगर ,गल्ली नं.४ ,जि.औरंगाबाद ,सध्या पुणे फिरस्ता २) राहुल राजु शिंदे ,वय.१९ वर्षे ,रा.साईबाबा कॉर्नर ,पेट्रोलपंपाजवळ ,कोपरगाव ,जि.अहमदनगर ,सध्या.पुणे फिरस्ता ३) अशोक बाबु लहाने ,वय.२२ वर्षे ,रा.शिंदेमळा ,सावेडी ,जि.अहमदनगर ,सध्या .पुणे फिरस्ता ४) दिपक भगवान खाजेकर ,वय.३० वर्षे ,रा.हारेगाव ,ता.श्रीरामपुर ,जि.अहमदनगर ,सध्या.पुणे फिरस्ता यांना सापळा रचुन स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने पकडले . त्याचेकडे कसुन तपास कला असता चारही आरोपींनी रेल्वेतील प्रवाशांचे गर्दीचा फायदा घेवुन व झोपेचा फायदा घेवुन मोबाईल व बॅग चोरले असल्याचे सांगितले. आरोपीकडुन पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे दाखल असलेले तीन गुन्हे उघडकीस आले असुन ,त्यामध्ये १,३४,९०० /–रु किमतीचा एकुण माल, त्यामध्ये १७ मोबाईल व ५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली आहे.या आरोपींकडुन अहमदनगर व दौंड रेल्वे पोलीस ठाणे येथील आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

मा.पोलीस अधीक्षक सो.श्री .तुषार पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.अनिल दबडे ,पो.उप.निरीक्षक बबन गायकवाड ,पो.हवा.अनिल दांगट ,पो.ना.अमरदिप साळुंके ,पो.ना.संतोष चांदणे ,पो.ना.जनार्दन गर्जे ,पो.शि.निलेश बिडकर ,पो.शि.राजेश कोकाटे ,पो.शि.ज्ञानेश्वर सुर्यवंशी,पो.शि.पवन बोराटे ,पो.शि.संदीप पवार ,पो.शि.भिसे ,पो.शि.गाडे ,चालक पो.हवा. जगदीश सावंत व पो.हवा.खोत यांनी सदरची कारवाई केली आहे.

Scanned by CamScanner